दैनिक
www.sahyandrinews.com
# सह्याद्रीचा राखणदार
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०१ ले • अंक ३११ • RNI : MAHMAR/2023/87818 • बुधवार दि.२१ ऑगस्ट२०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.





# बदलापूर प्रकरणाच्या तपासा साठी एसआयटी स्थापन

## गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांचे पोलीस खात्याला आदेश

**मुंबई (वृत्तसंस्था)**–बदलापूर मधील एका नामांकित शाळेत साडेतीन वर्षांच्या दोन चिमुकल्या मुलींवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.आणखी धक्कादायक बाब म्हणजे याबाबतची तक्रार देण्यासाठी मुलींचे कुटुंबीय बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात गेल्यानंतर त्यांना गुन्हा दाखल होण्यासाठी तब्बल १२ तास ताटकळत ठेवण्यात आलं. त्यामुळे पोलिसांच्या कारभाराबाबत संताप व्यक्त होतोय. आज सकाळपासून बदलापूर परिसरात आंदोलन सुरु आहेत. अशातच शिंदे सरकारने जनतेचा रोष पाहत तातडीने प्रकरणात गांभीर्याने लक्ष घेतले आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी काही वेळाआधीच बदलापूरच्या घटनेत प्रारंभीच्या काळात कारवाईत विलंब करणारे बदलापूर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक आणि हेडकॉन्स्टेबल यांना तत्काळ निलंबित करण्याचे आदेश ठाणे पोलिस आयुक्तांना दिले आहेत. बदलापूरच्या दुर्दैवी घटनेचा गतीने तपास करुन खटला जलदगती न्यायालयात चालविण्यात येईल आणि यात विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधीज्ञ उज्वल निकम यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहेआता सरकारने थेट याच प्रकरणात एसआयटी स्थापन करण्याची माहिती दिली आहे. बदलापूरातील गुन्ह्याचा तपास करण्यासाठी उपमुख्यमंत्री फडणवीसांच्या आदेशानुसार एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्याच्या विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ.आरती सिंह यांच्या अध्यक्षतेखाली सदर समिती गठीत करुन बदलापूर प्रकरणातील पुढचा तपास करण्यात येणार आहे.

### सीएम शिंदे यांचे बदलापूर अत्याचार प्रकरणावर ट्वीट

**बदलापूरमध्ये एका शाळेत मुलींवर झालेल्या अत्याचाराची अतिशय गंभीर दखल मुख्यमंत्री यांनी घेतली असून अशा घटना घडल्यास प्रसंगी संस्थाचालकांवर देखील कारवाई करण्यात येईल असा इशारा दिला आहे. आरोपीला कडक शासन करण्यात येईल, यासाठी जलदगती न्यायालयात तातडीने खटला चालविण्याचे निर्देशही त्यांनी दिले. या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी पोलीस आयुक्तांशी देखील चर्चा केली. सखी सावित्री समित्या शाळांमध्ये स्थापन झाल्या आहेत किंवा नाही ते तपासण्याचे निर्देशही त्यांनी दिले. बदलापूर पूर्वेतील एका नामांकित शाळेत दोन मुलींवर झालेल्या अत्याचाराची माहिती मिळताच मुख्यमंत्र्यांनी तातडीने शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्याशी चर्चा केली आणि अशा घटना होऊ नयेत म्हणून कायमस्वरूपी ठोस उपाय योजना करण्याचे सीएम शिंदे यांनी सांगितले आहे.**

## विलंब करणाऱ्या पोलिसांवर तातडीची कारवाई ; तीन अधिकारी निलंबित

### जलदगती न्यायालयात खटला

**उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. यासाठी खटला जलदगती न्यायालयात चालविण्याचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे आदेश त्यांनी ठाणे पोलिस आयुक्तांना दिले आहेत. या तातडीच्या कारवाईनंतर नागरिकांचा संताप कमी होईल का, हे पाहणं महत्त्वाचं ठरेल.**

### कारवाईची तातडीची पावलं

**नागरिकांच्या दबावानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने या प्रकरणात हस्तक्षेप करत बदलापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, आणि हेडकॉन्स्टेबल या तीन अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत. याशिवाय, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी पोलीस महानिरीक्षक दर्जाच्या वरिष्ठ आयपीएस अधिकारी आरती सिंग यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक (एसआयटी) गठित करण्याचे आदेशही दिले आहेत.**

**बदलापूर (वृत्तसंस्था)**–येथील एका नामांकित शाळेत दोन चार वर्षांच्या मुलींवर झालेल्या अमानुष अत्याचार प्रकरणामुळे संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. या घटनेत पोलिसांकडून मोठा हलगर्जीपणा झाल्याचं समोर आलं आहे. पीडित मुलींच्या पालकांना तब्बल १२ तास पोलिस ठाण्यात रखडवून गुन्हा दाखल करण्यात विलंब झाला. अखेर, नागरिकांच्या तीव्र नाराजीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने कारवाई करत बदलापूर पोलीस ठाण्याचे तीन अधिकारी निलंबित केले आहेत.



बदलापूर शहरातील एका प्रतिष्ठित शाळेत दोन चार वर्षांच्या चिमुकल्या मुलींवर शाळेतीलच एका कर्मचाऱ्याने प्रसाधनगृहात अत्याचार केले. मुलींनी हा संतापजनक प्रकार आपल्या पालकांना सांगितल्यानंतर पालकांनी तातडीने त्यांची वैद्यकीय तपासणी करून घेतली. तपासणीत मुलींवर अत्याचार झाल्याचं उघड झालं. ही घटना १२ ते १३ ऑगस्ट दरम्यान घडली होती. घटनेची माहिती मिळताच पालकांनी बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांना तब्बल १२ तास विलंब करण्यात आला. यामुळे पालकांच्या आणि नागरिकांच्या संतापाला उधाण आलं.

## वडकी पोलिसांनी ट्रकवर छापा मारून २३ गोवंश बैल जप्त केले

**राळेगाव । प्रतिनिधी**

१९ ऑगस्ट २०२४ रोजी वडकी पोलिसांनी देवधरी घाटात आयशर ट्रक क्र. एमएच ४०, सीडी १२०४ आणि आयशर ट्रक क्र. एमएच १८, बीजी ५१९७ ताब्यात घेतले. या ट्रकांमधून २३ नर जातीच्या गोवंशाची कत्तलीसाठी वाहतूक केली जात होती. पोलीसांनी ४ आरोपींविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ आणि प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

या गुन्ह्यात जप्त केलेला मुद्देमाल:
४,६०,००० रुपये किंमतीच्या २३ बैल
१५,००,००० रुपये किंमतीचा आयशर ट्रक क्र. एमएच ४०, सीडी १२०४
१५,००,००० रुपये किंमतीचा आयशर ट्रक क्र. एमएच १८, बीजी ५१९७
एकूण ३४,६०,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईचे नेतृत्व जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर वैजने केले आहे.



## झरगड शिवारात वाघाच्या हल्ल्यात बैल ठार

### शेतकऱ्याचे ५० हजार रुपयांचे नुकसान

**राळेगाव । प्रतिनिधी**

राळेगाव तालुक्यातील झरगड येथील शेतात वाघाच्या हल्ल्यामुळे एका बैलाचा मृत्यू झाल्याची घटना २० ऑगस्ट २०२४ रोजी घडली. हनुमान वाघाडे यांचे झरगड ते लोणी रोडवर असलेल्या शेतात, गोठ्यात बांधलेल्या दोन बैलांपैकी एका बैलावर वाघाने हल्ला केला. या हल्ल्यामुळे वाघाडे यांचे अंदाजे ५० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

घटनेच्या दिवशी हनुमान वाघाडे पहाटे शेतात गेले असता, त्यांनी गोठ्यातील एका बैलाच्या मानीवर आणि पायावर वाघाचे पंजे मारून त्याला ठार केलेले पाहिले. घटनास्थळी तपासणी करताना शेजारील नाल्यात वाघाचे पंजे आढळले. हा बैल तीन ते चार वर्षांचा होता आणि त्याची बाजार किंमत ४० ते ५० हजार रुपये होती. या घटनेने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याआधीही, दोन दिवसांपूर्वी, अंतरगाव शिवारात याच वाघाने गाईवर हल्ला केल्याची माहिती मिळाली आहे.घटनास्थळी रेंजर देवकाते, वनपाल कांबळे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रिंकू वासनीक, आणि पोलीस पाटील मनोज आत्राम यांनी पाहणी केली आहे.



## राज्य लोकसेवा हक्क आयुक्त अभय यावलकर यांचा २२ ऑगस्ट रोजी वरोरा तालुक्याला दौरा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत विविध कार्यालयीन कामकाजाची तपासणी आणि चर्चा करण्यासाठी राज्य लोकसेवा हक्क आयुक्त अभय यावलकर हे २२ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी १२ वाजता वरोरा उपविभागीय कार्यालयाला भेट देणार आहेत. या भेटीदरम्यान, तालुका स्तरीय विभाग प्रमुखांची आढावा बैठक आयोजित करण्यात येणार आहे.तसेच, यावलकर विविध शासकीय विभागांची कार्यालयीन तपासणी करणार आहेत. या कालावधीत नागरिकांना त्यांच्या सेवेसंबंधित तक्रारी आणि सूचना मांडण्यासाठी आयुक्तांना भेटण्याची संधी मिळणार आहे, अशी माहिती वरोराचे उपविभागीय अधिकारी शिवनंदा लंगडापुरे यांनी दिली आहे.

## भिसी नगर पंचायत आणखी किती बळी घेणार ?

### डेंग्युमुळे एकाचा मृत्यू, गावात शेकडो रुग्ण

**चिमूर । शेषराव राऊत**

चिमूर तालुक्यातील भिसी नगर पंचायतच्या भोंगळ कारभारामुळे नाल्यांची सफाई न केल्यामुळे आणि ठिकठिकाणी साचलेल्या गढूळ पाण्यामुळे गावात डेंग्यू, मलेरिया, हिवताप, आणि डायरिया यांसारख्या रोगांचा फैलाव झाला आहे. दोन दिवसांपूर्वी एका १३ वर्षीय विद्यार्थ्याचा डेंग्युमुळे मृत्यू झाला आहे. गावात डेंग्यू आणि मलेरियाचे शेकडो रुग्ण असून, विविध ठिकाणी त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. गावात साथीच्या रोगांचा फैलाव असून, नगर पंचायत प्रशासन अद्यापही कुंभकर्णी झोपेत आहे. नगर पंचायतीच्या भोंगळ कारभारामुळे आणखी किती रुग्णांचे बळी जाणार? असा प्रश्न भिसी तसेच परिसरातील जनतेला पडला आहे.




भिसी येथील रहिवासी रोहन जयभारत घरत (वय १३ वर्षे) आदर्श जनता विद्यालय भिसी येथे ८ व्या वर्गात शिक्षण घेत होता. रोहनला आठ दिवसांपूर्वी डेंग्यूची लागण झाली होती. सर्वप्रथम खाजगी आणि आरोग्य केंद्र भिसी येथे उपचार केल्यानंतर प्रकृती खालावल्याने रोहनला नागपूर येथील खाजगी दवाखाण्यात उपचाराकरिता दाखल करण्यात आले. मात्र, उपचार सुरू असताना शुक्रवारी पहाटेच्या सुमारास रोहनची प्राणज्योत मालवली.परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे मागील एका महिन्यापासून भिसी आणि परिसरात डेंग्यू, मलेरियासारख्या आजारांनी थैमान घातले आहे. आतापर्यंत जवळपास शंभर रुग्ण आढळले आहेत, आणि या संख्येत वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्राथमिक आरोग्य केंद्र असल्यामुळे अनेक डेंग्यूचे रुग्ण चिमूर, नागपूर आणि अन्य दवाखान्यांमध्ये उपचार घेत आहेत. नगर पंचायत प्रशासनाकडून साथीच्या रोगाची लागण होण्यापूर्वी संपूर्ण परिसरात कीटकनाशक औषधाची फवारणी करणे गरजेचे असताना, प्रशासनाने डेंग्यूचा फैलाव झाल्यानंतरच फवारणी सुरू केली आहे.

मृतक रोहनच्या वडिलांचा कोरोनामध्ये मृत्यू झाल्यामुळे, त्याची आई छोटासा व्यवसाय करून रोहन आणि त्याच्या बहिणीचे पालनपोषण करत होती. व्यवसायात रोहन आईला मदत करत असे, त्यामुळे त्याच्या मृत्युमुळे आईवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मृतकाच्या पश्चात आई, मोठी बहीण, आणि आप्त परिवार आहे. रोहनच्या मृत्यूने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. वरिष्ठ अधिकारी यांनी तात्काळ लक्ष देऊन भिसी परिसरातील ढासळलेली आरोग्य व्यवस्था दुरुस्त करून दोषी नगर पंचायत प्रशासन आणि स्वच्छता व आरोग्य विभागावर कारवाई करावी, अशी मागणी जनतेकडून होत आहे.

**“ रोहन घरत या मुलाला प्राथमिक आरोग्य केंद्रात आणले असता त्याला ताप आणि अशक्तपणा होता. त्यानंतर त्याची डेंग्यूची टेस्ट केली, आणि तो पॉजिटिव्ह आल्याने त्याच्या घरच्यांनी त्याला खाजगी रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक आरोग्य केंद्रात डेंग्यू रुग्णांवर प्राथमिक उपचार करून, त्यांना चिमूर, चंद्रपूर किंवा नागपूर येथील शासकीय रुग्णालयात रेफर करावे लागते. कारण अशा रुग्णांच्या तांबड्या आणि पांढऱ्या रक्तपेशींची तपासणी करून त्यावर उपचार करणे आवश्यक असते.**

**डॉ. कुंदन बावणकुडे, वैद्यकीय अधिकारी,**
**प्राथमिक आरोग्य केंद्र, भिसी**

# जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन



**प्रविण बागडे**
**नागपूर**
**९९२३६२०९१९**

आपल्या आयुष्यात आजी-आजोबांसारखे अनेक ज्येष्ठ नागरिक असतात, ज्यांच्या आरोग्यापासून त्यांच्या विचारांपर्यंत आपण अनेकदा दुर्लक्ष करतो. १९८८ साली, अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष रोनाल्ड रेगन यांनी याच समस्येकडे लक्ष वेधून ज्येष्ठ नागरिकांशी संबंधित समस्या आणि त्यांच्या जीवनमानावर परिणाम करणाऱ्या घटकांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन साजरा करण्याची घोषणा केली.
दरवर्षी २१ ऑगस्ट हा दिवस ज्येष्ठ नागरिक दिन म्हणून संपूर्ण जगभर साजरा केला जातो. या दिवशी वृद्धांच्या आरोग्याच्या समस्या, त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांविरुद्ध समाजामध्ये जनजागृती केली जाते.
१९९१ साली प्रथमच जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन साजरा करण्यात आला.
विशेषतः युनायटेड स्टेट्समध्ये, हा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.
याचा उद्देश समाजातील वृद्ध व्यक्तींच्या योगदानाला मान्यता देणे आणि त्यांचा सन्मान करणे हा आहे.
युनायटेड नेशन्सच्या अंदाजानुसार, २०५० पर्यंत वृद्ध व्यक्तींची संख्या १.५ अब्जांपेक्षा जास्त होईल, ज्यामध्ये विशेषतः आशिया आणि दक्षिणपूर्व आशियामध्ये ही वाढ ठळकपणे दिसून येईल. कमी विकसित राष्ट्रे या वृद्धांची संख्या नियंत्रीत करण्यासाठी आणि त्यांच्या कल्याणासाठी मजबूत व्यवस्था निर्माण करतील.
जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाचे मूळ १९ ऑगस्ट १९८८ रोजी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन यांनी घोषित केले होते. ५८४७ क्रमांकाच्या घोषणा पत्रात त्यांनी अमेरिकेतील कुटुंब, समुदाय आणि राष्ट्रातील वृद्ध व्यक्तींच्या योगदानावर प्रकाश टाकला. तसेच, युनायटेड स्टेट्स काँग्रेसने १३८ क्रमांकाच्या हाऊस जॉइंट रेझोल्युशनद्वारे दरवर्षी ऑगस्टचा तिसरा रविवार 'राष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिन' म्हणून घोषित करण्याची परवानगी दिली.
भारतामध्ये कायद्यानुसार, ६० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वयाची कोणतीही व्यक्ति (स्त्री किंवा पुरुष) ज्येष्ठ नागरिक म्हणून गणली जाते. भारतीय संस्कृतीत, ज्येष्ठ नागरिकांना आदराचे स्थान आहे आणि त्यांची काळजी घेणे हे राज्य सरकारचे सामाजिक कर्तव्य मानले जाते. राज्यातील ज्येष्ठ नागरिकांसाठी वृद्धाश्रम सुरू करण्यात आले आहेत, जिथे त्यांचे आहार, वैद्यकीय उपचार आणि इतर गरजा पूर्ण केल्या जातात.
रेल्वे प्रवासाच्या नियमांनुसार, किमान ६० वर्षे वयाचे पुरुष ज्येष्ठ नागरिक आणि किमान ५८ वर्षे वयाच्या महिला ज्येष्ठ नागरिकांना मेल/एक्स्प्रेस/राजधानी/शताब्दी/जनशताब्दी/दुरांतो गटाच्या सर्व वर्गांच्या भाड्यात सवलत दिली जाते. ही सवलत पुरुषांसाठी ४०% आणि महिलांसाठी ५०% आहे.
आज, २१ ऑगस्ट, जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन साजरा केला जातो. या दिनाच्या निमित्ताने आपल्या समाजातील सर्व ज्येष्ठ नागरिकांना हार्दिक शुभेच्छा!

# सनईसम्राट बिस्मिल्ला खान



भारताच्या स्वातंत्र्यदिनी सनईवादनासाठी बिस्मिल्ला खान यांना पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी लाल किल्ल्यावर आमंत्रित केले. त्यांनी देशभरात आणि परदेशात अनेक ठिकाणी सनईवादन केले. 'गूंज उठी शहनाई' आणि 'स्वदेस' या चित्रपटात त्यांचे सनईवादन खूपच लोकप्रिय झाले.
सहीताद्या सनईवादक बिस्मिल्ला खान यांचा जन्म २१ मार्च १९१६ रोजी बिहारमधील दुमराव येथे झाला. त्यांचे मूळ नाव कमरूद्दिन खान होते. त्यांनी वयाच्या सहाव्या वर्षी वाराणसी येथे सनईवादनाचे शिक्षण घेणे सुरू केले. त्यांनी १९३० मध्ये अलाहाबादच्या अखिल भारतीय संगीत परिषदेत पहिल्यांदा सार्वजनिक सनईवादन केले.
बिस्मिल्ला खान हे अखिल भारतीय कीर्तीचे सुप्रसिद्ध सनईवादक होते. त्यांनी कन्नड अभिनेते राजकुमार यांच्या चित्रपटासाठी आणि सत्यजित राय यांच्या 'जलसाघर' चित्रपटात भूमिका साकारली. त्यांच्या वादनात गायन आणि वादनाच्या विविध शैलींचा अपूर्व समन्वय होता.
त्यांना १९५५ मध्ये अखिल भारतीय शहनाई चक्रवर्ती, १९६१ मध्ये संगीत नाटक अकादमी पुरस्कार, १९६८ मध्ये पद्मभूषण, १९८० मध्ये पद्मविभूषण आणि २००१ मध्ये भारतरत्न पुरस्कार मिळाले. बिस्मिल्ला खान यांचे २१ ऑगस्ट २००६ रोजी हृदयविकाराने निधन झाले.पावन स्मृतिदिनी त्यांना व त्यांच्या कलाविष्कारास विनम्र अभिवादन!

**-श्री.एन.के.कुमार, सेवानिवृत्त अध्यापक, गडचिरोली, मोबा- ७७७५०४१०८६**

# लष्करी शिक्षण हवे

राष्ट्रीयत्वाचे संस्कार रुजविण्यासाठी शालेय जीवनातच लष्करी प्रशिक्षण प्रत्येक विद्यार्थाला, विद्यार्थिनींना अनिवार्य करण्याची आवश्यकता असल्याचे सुमेधाताई चिथडे यांनी दिलेला विचार मौलिक असून आज खरोखरच त्याची अत्यंत आवश्यकता भासते आहे. जेणे करून त्यागातील आनंद, राष्ट्रप्रेम, योगदान, बंधुभाव, निरपेक्षता, कष्टाची किंमत आणि श्रमाची शक्ती, प्रतिकूल परिस्थिती ही धाडसाने सामना करण्याची वृत्ती, शिस्त या संस्कारांची होत असलेली घसरण निदान लष्करी शिक्षणाच्या माध्यमातून तरी जोपासली जाईल आणि याची सुरुवात शालेय शिक्षणाच्या पायरीवरून होणे महत्वपूर्ण आहे. एक उत्तम, सुसंस्कृत शिस्तबद्ध नागरिक यातून तयार होईल. हे ही नसे थोडके. संबंधितांनी यावर सकारात्मक निर्णय घेणे आवश्यक वाटते.

**विश्वनाथ पंडित,ठाणे**

# विवेकानंद विद्यालयात रक्षाबंधन साजरा

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक विवेकानंद विद्यालयात भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा प्रतीक असलेल्या रक्षाबंधनाचा सण उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर, शाळेच्या मुख्याध्यापिका रोशनी काळे आणि संस्थेचे प्रशासकीय अधिकारी वसंत उपाध्ये यांनी या खास दिवशीच्या महत्वाचे विश्लेषण केले. उपाध्ये यांनी भारतीय संस्कृतीतील रक्षाबंधनाच्या ऐतिहासिक महत्त्वावर प्रकाश टाकत, आधुनिक काळात प्रत्येक भावाने आपल्या बहिणीच्या रक्षणासाठी कटिबद्ध असले पाहिजे, असे मार्गदर्शन केले.
कार्यक्रमानंतर, विद्यालयातील मुलींनी स्वतः तयार केलेल्या राख्या मुलांना बांधल्या आणि मुलांनी त्यांना ओवाळणी स्वरूपात खाऊ दिला.कार्यक्रमाचे संचालन शाळेच्या शिक्षिका धनश्री बांद्रे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सक्रियपणे सहकार्य केले.



# राजीव गांधींचं बलिदान हिंदुस्थान कधीच विसरणार नाही-संतोषसिंह रावत





**मूल । प्रतिनिधी**

राजीव गांधींचं बलिदान हिंदुस्थान कधीच विसरणार नाही, असे भावनिक उद्गार काँग्रेस नेते आणि सीडीसीसी बँकेचे अध्यक्ष संतोषसिंह रावत यांनी काढले. राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त मूल येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना त्यांनी युवकांना काँग्रेसमध्ये येऊन गांधींचं स्वप्न साकार करण्याचं आवाहन केलं.
संतोषसिंह रावत यांनी आपल्या भाषणात राजीव गांधी यांच्या हत्येचा उल्लेख करताना जुन्या आठवणींना उजाळा दिला. त्या काळात मी भाजपमध्ये एक युवक कार्यकर्ता होतो. राजीव गांधी यांच्या हत्येच्या दुसऱ्याच दिवशी, शेकडो युवा कार्यकर्त्यांसह आम्ही संपूर्ण मूल बंद करण्याचं आंदोलन केलं होतं. त्या वेळी, मुल ग्राम पंचायतीचे सरपंच विरोधात होते. त्यांनी दुकान बंद करण्यास नकार दिला, पण आम्ही बंद आंदोलन तीव्र केलं. आमच्यावर बंदुकीचा धाक दाखवला, तरीही आम्ही मागे हटलो नाही, अखेर त्यांना दुकान बंद करण्यास भाग पाडलं. हीच ताकद युवकांमध्ये आहे, असं त्यांनी आवर्जून सांगितलं.यावेळी तालुका काँग्रेस मूलचे अध्यक्ष गुरु गुरनुले यांनीही युवकांमध्येच काँग्रेसचं संघटन मजबूत करण्याची ताकद असल्याचं सांगितलं. तसेच, त्यांनी राजीव गांधींचे विचार पुढे नेण्याचं आवाहन केलं.
कार्यक्रमाला कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती राजेश रत्नावार, उपसभापती राजेंद्र कन्नमवार, जिल्हा काँग्रेस महासचिव घनश्याम येनुरकर, राजू पाटील मारकवार, माजी जी.प. सदस्या मंगला आत्राम, महिला शहर अध्यक्षा नलिनी आडपवार यांच्यासह काँग्रेसचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.कार्यक्रमाचं सूत्रसंचालन नलिनी आडपवार यांनी केलं, तर शहर काँग्रेस अध्यक्ष सुनील शेरकी यांनी आभार मानले. कार्यक्रमाला सोसायटी संचालक विवेक मुत्यलवार, युवक शहर उपाध्यक्ष संदीप मोहबे, सरपंच संघटनेचे अध्यक्ष राहुल मुरकुटे, जनार्दन भुरसे, अभिजित चेपूरवार, अतुल गोवर्धन, विष्णू सादमवार, गणेश रणदिवे यांच्यासह महिला काँग्रेसच्या कार्यकर्त्या उपस्थित होत्या.
कार्यक्रमात सर्वांनी राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केलं.

# चंद्रपूर जिल्हा कारागृहात रक्षाबंधन साजरा

## रोटरी क्लबच्या भगिनींनी बांधल्या राख्या



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ चंद्रपूर आणि चंद्रपूर जिल्हा कारागृह यांच्या संयुक्त विद्यमाने १९ ऑगस्ट २०२४ रोजी बंदीगृहातील बंदी बांधवांसाठी रक्षाबंधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात रोटरी क्लबच्या भगिनींनी बंदी बांधवांना राख्या बांधून हा विशेष दिवस साजरा केला.
कार्यक्रमाचे प्रकल्प निर्देशक डॉ. आसावरी देवतळे आणि नंदाताई आलूरवार यांनी कार्यक्रमाची रूपरेषा ठरवली होती. सकाळी ९.३० वाजता रोटरी क्लबचे अध्यक्ष अजय पालारपवार, सदस्य डॉ. प्रणीता ओसवाल, स्मिता जिवतोडे, अलका ठाकरे, नंदा आलूरवार, अर्चना पालारपवार, रमेश गोयल, आणि मिलींद बोडखे कारागृहात उपस्थित होते.
कार्यक्रमाच्या सुरुवातीला अजय पालारपवार यांनी प्रास्ताविक भाषणात रोटरी क्लबच्या वतीने दरवर्षी बंदी बांधवांसोबत रक्षाबंधन साजरा करण्याची परंपरा असल्याचे सांगितले. नंदा आलूरवार आणि डॉ. अलका ठाकरे यांनी रक्षाबंधनाचे महत्व बंदी बांधवांना समजावून सांगितले.
जिल्हा कारागृहाचे वरिष्ठ तुरूंग अधिकारी सतिश सोनवने यांनीही आपले विचार व्यक्त केले. रोटरी क्लबच्या महिला सदस्यांनी बंदी बांधवांना राखी बांधून आणि मिठाई वाटप करून त्यांच्या कडून बहिनींच्या रक्षणाचे आश्वासन घेतले. कार्यक्रमाचा समारोप कारागृहाचे शिक्षक संजीव हतवादे यांच्या उपस्थितीत करण्यात आला, तर रोटरी क्लबचे सचिव मिलींद बोडखे यांनी आभार प्रदर्शन केले.

# जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने २३ ऑगस्ट रोजी रोजगार मेळाव्याचे आयोजन

## विद्यार्थांना मिळणार प्रशिक्षणार्थी नेमणूक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे २३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात, पात्र उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार प्रशिक्षणार्थी म्हणून विविध आस्थापनांमध्ये नेमणूक दिली जाणार आहे.या योजनेअंतर्गत शासकीय/निमशासकीय आस्थापना, खाजगी/सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग, सहकारी संस्था, सामाजिक संस्था, सेवा क्षेत्रातील खाजगी/सार्वजनिक आस्थापना/कंपन्या/उपक्रम/संस्था यांमध्ये विद्यार्थांना नेमणूक मिळणार आहे. शैक्षणिक पात्रतेनुसार १२ वी पास विद्यार्थांना प्रतिमाह ६ हजार रुपये, आय टी आय/पदवीधरांना ८ हजार रुपये, तर पदवीधर/पदव्युत्तर विद्यार्थांना प्रतिमाह १० हजार रुपये विद्यावेतन देण्यात येणार आहे.
उमेदवारांनी त्यांच्या शैक्षणिक पात्रता सिद्ध करणारी मूळ प्रमाणपत्रे घेऊन वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# पठाणपूरा व्यायामशाळा सर्व सुविधांनी युक्त बनविणार: आ. किशोर जोरगेवार





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

परंपरागत खेळ संस्कृती जपणाऱ्या पठाणपूरा व्यायामशाळेच्या विकासासाठी १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या कामाचे भूमिपूजन आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते करण्यात आले.
यावेळी बोलताना आ. जोरगेवार म्हणाले, पठाणपूरा व्यायामशाळा ही अतिशय जुनी असून येथे अनेक क्रीडापटूंनी परिश्रम घेतले आहेत. याच परिश्रमाचे फळ म्हणजे येथील खेळाडूंनी राज्य आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या व्यायामशाळेला सर्व सोयी-सुविधांनी युक्त बनविण्याचा आमचा संकल्प आहे. एक कोटी रुपयांचा निधी या विकासकामासाठी उपलब्ध केला असून आवश्यकतेनुसार आणखी निधी कमी पडू देणार नाही.
कार्यक्रमाला माजी नगरसेवक नंदू नागरकर, विजय चहारे, माजी नगरसेविका खशबु चौधरी, अरविंद चहारे, माजी नगरसेवक प्रशांत दानव, बबन चहारे, श्रीकांत चहारे, सुधाकर बुटले, रमेश चहारे, बाळू कातकर, रमेश भुते, धन्ना येरेवार, प्रदीप पुगलिया, श्रीहरी पुगलिया, रुपेश चहारे, कुणाल चहारे, यंग चांदा ब्रिगेडच्या महिला शहर संघटिका वंदना हातगावकर, बंगाली समाज महिला शहर संघटिका सविता दंढारे आदी मान्यवर उपस्थित होते.
आ. जोरगेवार पुढे म्हणाले, १ कोटी रुपयांतून तयार होणारी ही व्यायामशाळा केवळ शारीरिक तंदुरुस्तीचा केंद्रबिंदू नसेल, तर ती समाजातील प्रत्येक व्यक्तीला आरोग्यदायी जीवनशैलीकडे मार्गदर्शन करणारी ठरेल. आपण चंद्रपूरात अनेक विकासात्मक कामे मार्गी लावली आहेत. विशेषतः अभ्यासिका, व्यायामशाळा आणि समाजभवन यावर अधिक भर दिला आहे. या माध्यमातून संपूर्ण मानव विकास साधता येतो.
कार्यक्रमानंतर पठाणपूरा व्यायामशाळेच्या वतीने आमदार किशोर जोरगेवार यांचे जोळ देऊळ चौकातून भव्य मिरवणूक काढून स्वागत करण्यात आले. या मिरवणुकीत लेझीम पथक आणि परंपरागत खेळांचे प्रात्यक्षिके सादर करण्यात आले. यावेळी, या अनोख्या स्वागतासाठी आ. जोरगेवार यांनी व्यायामशाळेचे पदाधिकारी आणि वॉर्डवासीयांचे आभार मानले.

सह्याद्रीचा राखणदार



# समस्या सोडविण्याची जबाबदारी माझी: मंत्री धर्मराव बाबा आत्राम

## दामरंचा येथे थेट जनतेशी साधला संवाद;राज्याच्या शेवटच्या टोकावरील गावात जल्लोषात स्वागत





**अहेरी । प्रतिनिधी**

सर्वसामान्य लोकांनी निवडून दिल्यानेच मला कॅबिनेट मंत्री पदाचा दर्जा मिळाला आहे. मंत्री झालोय म्हणून मुंबईत बसून काम चालणार नाही. ज्या सर्वसामान्य जनतेनी विश्वास दाखवून मला आमदार म्हणून निवडून दिले, त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या प्राधान्याने सोडविणे ही माझी पहिली जबाबदारी आहे. जनतेत गेल्याशिवाय समस्या कळणार नाहीत, त्यामुळेच आपल्यापर्यंत आलोय. तुम्ही फक्त समस्या सांगा, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी दामरंचा येथे केले.

महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्यांच्या सीमेवरील इंद्रावती नदीच्या काठावर असलेल्या अहेरी तालुक्यातील दामरंचा गावात मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांच्या उपस्थितीत भव्य कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत मंत्री आत्राम यांनी जनतेशी थेट संवाद साधला.कार्यक्रमात माजी पंचायत समिती सदस्य रामेश्वर बाबा आत्राम, हर्षवर्धन बाबा आत्राम, राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ कार्यकर्ता मलय्या साकेट, हनमंतू आलाम, माजी सरपंच सांबय्या करपेत आदी मान्यवर उपस्थित होते.

मंत्री धर्मराव बाबा आत्राम पुढे बोलताना म्हणाले, मी मुंबईत असो की अहेरीत, आपल्याला जनतेचे काम करायचे आहे. मागील काही दिवसांपासून विविध भागातील कार्यकर्ते आणि सामान्य जनतेची भेट घेऊन त्यांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे. दामरंचा परिसर दुर्गम भाग म्हणून ओळखला जातो. राज्याच्या शेवटच्या टोकावरील हा गाव आहे. सर्वांना माझी भेट घेण्यासाठी अहेरी येणे शक्य होत नाही, त्यामुळेच मी स्वतः आपल्या भेटीसाठी आलो आहे.

यावेळी उपस्थितांनी चर्चेच्या माध्यमातून विजेची समस्या, भ्रमणध्वनी समस्या, आणि आदिवासींच्या जातीच्या दाखल्यांच्या अभावासंबंधी तक्रारी मांडल्या. मंत्री आत्राम यांनी या सर्व समस्यांवर प्राधान्याने उपाय करण्याचे आश्वासन दिले आणि संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ निर्देश दिले. तसेच, लिफ्ट इरिगेशनचे बंद असलेले काम लवकरात लवकर सुरू करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.दामरंचा येथे आगमन होताच मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांचे परिसरातील नागरिकांनी पारंपरिक पद्धतीने जल्लोषात स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन कैलास कोरेत यांनी केले.

# आदिवासी परधान समाजाची महत्त्वाची चिंतन बैठक संपन्न



**राळेगाव । प्रतिनिधी**

राळेगाव मतदारसंघातील शासकीय विश्रामगृह येथे आदिवासी परधान समाजाची महत्त्वाची चिंतन बैठक २०२४ मध्ये संपन्न झाली. या बैठकीचे अध्यक्ष म्हणून बंडू सोयाम (पांढरकडा) आणि प्रमुख पाहुणे म्हणून नरेश गेडाम (यवतमाळ) उपस्थित होते. याशिवाय, आदिवासी सेवक किरण कुमरे, माजी पंचायत समिती सभापती सुरेश मेश्राम, सुधारकर गेडाम, नारायन पेंदोर, देवानंद सोयाम , सुरेश कोवे , गोपाल आडे, दिलीप हिवरकर, शिवदास कोवे, रवि कनाके, पांढरकवडा, जीवन कोवे, बंडू मेश्राम (यवतमाळ), विलास टेकाम, रामाजी कुलसंगे, बंडू केळकर (यवतमाळ), बंडू कनाके, मोहन आत्राम , हनुमान मेश्राम (पांढरकडा), तुळशीराम गेडाम, राजेंद्र सिडाम, कृष्णा कनाके, विलास कोवे (पांढरकवडा), आणि अशोक गिरडकर तसेच विक्रम पेंदोर यांची उपस्थिती होती.

या बैठकीला राळेगाव मतदारसंघाचे आमदार अशोक उईके यांनी विशेष भेट दिली. त्यांनी समाजाच्या निर्णयांना मान्यता देण्याची ग्वाही दिली आणि समाजाचा कायमचा सेवक म्हणून काम करण्याचे आश्वासन दिले.या बैठकीचे आयोजन आणि पुढाकार संदिप पेंदोर यांनी घेतला . त्यांनी समाजाच्या एकतेसाठी सतत प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. आगामी काळात मोठ्या बैठकीचे आयोजन करण्यात येईल, असे आयोजक मंडळीने सुचवले आहे.

## कोलकत्त्यात महिला डॉक्टरवर अत्याचार करून निघृण हत्या करणाऱ्यास

# फाशीची शिक्षा देण्याची मागणी माजी आमदार पृथ्वीराज साठे



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

कोलकत्यातील आर.जी. कार मेडिकल कॉलेजमध्ये कार्यरत असणाऱ्या महिला डॉक्टरवर अत्याचार करून अमानुषपणे हत्या करणाऱ्यास तात्काळ फाशीची शिक्षा देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी केली आहे. २० ऑगस्ट रोजी उपजिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी या घटनेचा जाहीर निषेध करत व मृत डॉक्टरच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी कठोर कारवाईची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ९ ऑगस्ट २०२४ रोजी कोलकत्यात महिला डॉक्टरवर अत्याचार करून तिची निघृण हत्या करण्यात आली. याशिवाय राजस्थानमध्ये एका नर्सवरही अत्याचार करून हत्या करण्यात आली. या दोन्ही घटनांमधील आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली असून सरकारी आरोग्य व्यवस्थेत कार्यरत डॉक्टर, परिचारिका आणि इतर आरोग्य सेवकांच्या सुरक्षेचा मुद्दा उठवला आहे.

या निवेदनावर माजी आमदार पृथ्वीराज साठे, ॲड. इस्माईल गवळी, संजीवनी देशमुख, तानबा लांडगे, ॲड. शहानवाज खान पठाण, ॲड. विनोद निंबाळकर, हमीद चौधरी, रामराव आडे, सुधाकर जोगदंड, नामदेव गाडदे, अमन परदेशी, सलिम पिंजारी, गफार भाई, रोहित हुलगुंडे, गफार गवळी, जुम्मा चौधरी, फैजान मिर्झा, धनराज सोनवणे, अमोल सरवदे, रमजान गवळी, विनायक पवार, जावेद पप्पुवाले, राहुल सिरसट, इम्रान पठाण, व्यंकट मुंडे, रणजित जोगदंड, रवी जोगदंड, गणेश शेप आदींसह इतरांच्या स्वाक्षऱ्या आहेत. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# परळी वैद्यनाथ नगरीत राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचे आयोजन

**परळी वैद्यनाथ**–२१ ऑगस्टपासून परळी वैद्यनाथ नगरीत राज्यस्तरीय कृषी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. बीड जिल्ह्यातील इतिहासातील पहिला कृषी महोत्सव असलेला हा कार्यक्रम सर्व शेतकरी बांधवांसाठी उपयुक्त ठरणार आहे.या महोत्सवात भव्य कृषी प्रदर्शन, पशु प्रदर्शन, धान्य महोत्सव, चर्चा सत्रे व शेतकरी संवाद, विविध आधुनिक उपकरणे व अवजारांची प्रात्यक्षिके, रानभाज्या महोत्सव, यशस्वी शेतकऱ्यांचा सन्मान, तसेच उत्पादक ते ग्राहक थेट विक्री यांसारख्या अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.उद्या होणाऱ्या या कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रांताध्यक्ष खा. सुनील तटकरे, क्रीडामंत्री संजय बनसोडे, बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, अल्पसंख्यांक विकासमंत्री अब्दुल सत्तार, सार्वजनिक आरोग्य मंत्री तानाजी सावंत, कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांसह अन्य मान्यवर लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

# बिरसा ब्रिगेडच्या माध्यमातून मेटीखेडा येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

**राळेगाव । प्रतिनिधी**

बिरसा ब्रिगेडने जनतेच्या आरोग्याच्या देखभालीसाठी पुढाकार घेतला असून, १८ ऑगस्ट २०२४ रोजी मेटीखेडा येथे मोफत हाडांच्या आजारांसंदर्भात वैद्यकीय तपासणी व औषध वितरण शिबिराचे आयोजन केले.

या शिबिराचे अध्यक्ष प्रा. वसंतराव कनाके होते, आणि उद्घाटन बिरसा ब्रिगेडचे प्रदेश अध्यक्ष डॉ. अरविंद कुळमेथे यांनी केले. गावचे सरपंच गेडाम हेसुद्धा उपस्थित होते. शिबिरात प्रमुख डॉक्टर म्हणून डॉ. आशिष चव्हान (एम. एस. ऑर्थो तज्ञ) आणि डॉ. निलेश चव्हान (एम. एस. ऑर्थो तज्ञ) यांनी जनतेच्या आरोग्याची तपासणी केली आणि आवश्यक औषधे मोफत दिली. एकूण २०० रुग्णांची तपासणी करण्यात आली.

आरोग्य शिबिराच्या सुरवातीला डॉक्टरांचे आणि पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. रुग्णांना आरोग्याच्या काळजीची आणि आजारांच्या उपचारासंदर्भातील शासनाच्या सुविधांची माहिती दिली गेली. शिबिरात बिरसा ब्रिगेडचे जिल्हा कार्याध्यक्ष उमेश येरमे, जिल्हा मीडिया प्रमुख विनोद उईके, जिल्हा संपर्क प्रमुख सुरज मरस्कल्हे, आणि अल्केश कनाके यांनी रुग्णांचे सेवेसाठी योगदान दिले.या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी बिरसा ब्रिगेडच्या रोशन घोडाम, अभी ठाकरे, संकेत घोडाम, सुमित पुंने, तुषार घोडाम, धनराज आडे, रविकांत उईके, किशोर कोवे, योगेश तुमराम, आणि कवीश्वर गेडाम यांचे सहकार्य लाभले.





# जीवनाला मार्गदर्शक करणारा अभंगगाथेसारखा दुसरा वाटसरू नाही - डॉ.नंदकुमार मोरे



■ डॉ नंदकुमार मोरे यांचा गौरव करताना प्र– कुलगुरू श्रीराम कावळे



■ डॉ अशोक राणा यांचा गौरव करताना अधिष्ठाता डॉ पाटील

**गडचिरोली (प्रतिनिधी)–संत तुकाराम महाराजांची अभंगगाथा जीवनाला मार्गदर्शन करते. जीवनातील वैफल्य, निरागसता, निष्क्रियता आणि निष्फळता दूर करण्याचे सामर्थ्य अभंगगाथेत आहे. तुकाराम गाथेसारखा दुसरा वाटसरू सुद्धा नाही. राष्ट्रपिता महात्मा गांधीना संत तुकारामांचे अभंग प्रिय होते. त्यांना आवडणाऱ्या निवडक शंभर अभंगाचे त्यांनी इंग्रजीत भाषांतर करून घेतले होते. अशा शब्दात कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठातील तुकाराम अध्यासनाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी संत तुकारामाच्या अभंगगाथेचा गौरव केला.**

गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाच्या संत तुकाराम महाराज अध्यासनाच्या वतीने १७ ऑगस्ट २०२४ रोजी शिबिर तीन विद्यापीठ परिसरात आयोजित केलेल्या प्रबोधन शिबिराच्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते. गोंडवाना विद्यापीठाचे प्र कुलगुरू, डॉ. श्रीराम कावळे, यांच्या हस्ते झालेल्या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून साहित्य अकादमी नवी दिल्ली चे सदस्य डॉ. प्रमोद मुनघाटे, विद्यापीठाच्या मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. धनराज पाटील तथा मराठी विभागाचे समन्वयक डॉ.श्याम खंडारे, तसेच प्रबोधन शिबिराचे संयोजक डॉ. हेमराज निखाडे उपस्थित होते. या प्रसंगी डॉ. नंदकुमार मोरे यांनी कोल्हापूर विद्यापीठाने प्रकाशित केलेली दोन खंडातील संत तुकारामाची अभंगगाथा प्र–कुलगुरूंच्या हस्ते विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाला भेट दिली. संत तुकाराम महाराज यांच्या कार्याची समकालीन प्रस्तुतता' या विषयावर बोलतांना डॉ. मोरे म्हणाले की, 'संत तुकाराम महाराजापासून प्रेरणा घेऊनच शिवाजी महाराजांनी त्यांच्या सैन्याला मार्गदर्शन केले आणि गोरगरीब वंचितांच्या हिताची भूमिका घेतली.

दुसऱ्या सत्रात डॉ. अशोक राणा यांनी संत तुकाराम यांचा विदर्भातील संतांच्या विचारांवर कसा प्रभाव आहे, या विषयावर मार्गदर्शन केले. संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि गणपती महाराज यांनी मांडलेल्या बुद्धीप्रमाण्यवादी विचारांची आणि त्यांच्या विषमता विरोधी कार्याची प्रेरणा संत तुकारामांचे अभंग हीच होती, असे प्रतिपादन केले.

शिबिराचे प्रास्ताविक डॉ. हेमराज निखाडे आणि सूत्रसंचालन डॉ.नीलकंठ नरवाडे यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ.सविता गोविंदवार यांनी मानले.

# कोलकत्ता घटनेचा वैद्यकीय संघटनेकडून निषेध



**मूल । प्रतिनिधी**

कोलकत्ता येथील आर.जी.कार वैद्यकीय महाविद्यालयातील महिला डॉक्टरवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत मुल येथील जनरल मेडिकल प्रॅक्टीशनर असोसिएशनने एक दिवस वैद्यकीय सेवा बंद ठेवली आणि कडक कारवाईची मागणी केली आहे.

असोसिएशनने उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत देशाचे पंतप्रधानांना सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या घटनेने महिलांसाठी असुरक्षिततेचे आणि सुरक्षेच्या अभावाचे दोन आयाम उघडले आहेत. त्यामुळे देशाच्या विवेकाला धक्का बसला आहे. असोसिएशनने साथीच्या रोग कायद्यात सुधारणा करून २०१९ च्या मसुदा रुग्णालय संरक्षण विधेयकात समाविष्ट करावे, सर्व रुग्णालयांमध्ये सुरक्षा कडक करावी आणि कर्तव्यावर असलेल्या डॉक्टर व कर्मचाऱ्यांना सुरक्षा प्रदान करावी अशी मागणी केली आहे.घटनेची सखोल चौकशी करून अत्याचार करणाऱ्यांना कडक शासन करावे आणि पीडित महिलेच्या कुटुंबाला सुरक्षा आणि नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी असोसिएशनने केली आहे.या निवेदनावर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुभाष रेड्डीवार, उपाध्यक्ष डॉ. दिनेश व–हाडे, सचिव डॉ. विनोद चौधरी, खजिनदार डॉ. उज्वल बोकारे, डॉ. मार्टिन अझीम, डॉ. आशिष कुलकर्णी, डॉ. प्रमोद गोंगले, डॉ. सायली बोकारे, डॉ. प्रवीणा व–हाडे, डॉ. मनीषा शेंडे, डॉ. तीरथ उराडे, डॉ. दिलीप शिरपूरवार, डॉ. सुखदेव बरडे, डॉ. पद्माकर लेनगुरे आणि डॉ. संजय बुक्कावार यांसह अनेक सदस्य उपस्थित होते.

# नवनिर्वाचित खा.अमर काळे यांचा पुलगाव येथे नागरी सत्कार

**पुलगाव । प्रतिनिधी**

वर्धा लोकसभा मतदारसंघातून निवडून आलेले नवनिर्वाचित खासदार अमर काळे यांचा महाविकास आघाडीच्या वतीने पुलगाव येथील कन्हैया मंगलममध्ये नागरी सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वर्धा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष सुनिल राऊत होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मनोज चांदुरकर आणि शिवसेना (ऊबाठा) चे जिल्हाध्यक्ष आशिष पांडे उपस्थित होते.








सत्कार समारंभात पुलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मनोज वसु, संचालक संजय बोबडे, माजी नगराध्यक्ष मनीषकुमार साहू, साबीर कुरेशी यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) चे पदाधिकारी, कार्यकर्ते, आणि महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष श्यामसुंदर देशमुख यांनी केले, ज्यात त्यांनी शहराच्या विविध समस्या मांडल्या. काँग्रेसच्या वतीने रमेशचंद्र सावरकर यांनी भाषण केले, तर जिल्हाध्यक्ष मनोज चांदुरकर यांनी पुलगाव आणि जिल्ह्याच्या विविध समस्यांवर चर्चा केली. शिवसेनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष आशिष पांडे यांनी पुलगाव येथे औद्योगिक वसाहत निर्माण करण्याची मागणी केली.

वर्धा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष सुनिल राऊत यांनी शेतकऱ्यांच्या अडचणींवर बोलताना महाविकास आघाडीच्या एकजुटीची स्तुती केली आणि विधानसभेतही अशीच कामगिरी केल्यास आघाडीच्या सहाही जागांवर विजय मिळवू शकतो, असा विश्वास व्यक्त केला.सत्काराला उत्तर देताना अमर काळे यांनी सांगितले की, हा माझा सत्कार नसून, असंख्य गोरगरीब, शेतकरी, शेतमजूर, कामगार, आणि सर्व कार्यकर्त्यांचा हा सत्कार आहे. मोदी साहेबांच्या विरोधात जनतेने मतदानाद्वारे व्यक्त केलेला विरोध माझ्या निवडणुकीतून दिसून आला आहे. त्यांनी पुलगाव शहरातील जनतेला न्याय देण्यासाठी वचन दिले आणि जिल्ह्यातील अनेक समस्यांवर भाष्य केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुभाष झांझरी, डॉ विजय राऊत, सुभाष ढोले, बाळा शहागडकर, विजय भटकर, अनिल भोयर, ॲड. विद्याधर माथने, महादेव भोयर, बाबाराव बीरे, इमरान शेख, अभिषेक मस्के, मयूर येडे, वैष्णव ढोले, शुभम खडसे, विलास सिर्सिकर, निवृत्ती रुद्रकार, सतीश श्रावक, कामगार नेते संदीप भांडवलकर, पुंडलीक पांडे आणि महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन विठ्ठल वानखेडे यांनी केले.

# भटकेपण स्विकारले,पण भटाळले नाही–डॉ.मनोहर नाईक

**नागपूर । प्रतिनिधी**

इथले सगळेच विवंचनाग्रस्त लोकसमूह वैदिक संस्कृतीचे बळी आहेत. वैदिकांनी देव, धर्म, अंधश्रद्धा, कर्मकांड ही सगळी शोषणाची हत्यारे वापरून इथल्या आद्यवासी लोकांचे सांस्कृतिक अपहरण केले. परंतु भटक्या-विमुक्तांनी वैदिक संस्कृतीविरुद्ध बंड करून आपली सांस्कृतिक अस्मिता अभंग ठेवली. त्या बंडाची शिक्षा म्हणून त्यांनी भटकेपण स्वीकारले, पण वैदिक संस्कृतीला अपेक्षित असलेले भटाळलेपण त्यांनी स्वीकारले नाही असे सडेतोड प्रतिपादन डॉ. मनोहर नाईक यांनी केले. अखिल भारतीय तांडा सुधार समिती आणि सरस्वती माता सामाजिक बहुउद्देशीय संस्था द्वारा आयोजित पद्मश्री रामसिंगजी भानावत यांची जयंती आणि महानायक वसंतराव नाईक यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने डॉ. प्रकाश राठोड यांच्या अध्यक्षतेखाली आयोजिलेल्या आभासी कार्यक्रमात व्याख्याते म्हणून ते बोलत होते.




दुसरे व्याख्याते माजी सनदी अधिकारी मा. बी. के. नाईक यांनी आपल्या अभ्यासपूर्ण चिंतनातून पद्मश्री रामसिंगजी भानावत यांचा खडतर जीवनप्रवास श्रोत्यांपुढे पेश करून त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे उत्कट दर्शन घडविले. डॉ. प्रकाश राठोड यांनी संत सेवालाल महाराज, महानायक वसंतराव नाईक आणि पद्मश्री रामसिंगजी भानावत अशा युगनायकांच्या विचारातील क्रांतिकारकता समजून घेऊन त्याचा स्वीकार केल्याशिवाय भटक्या - विमुक्तांचे वैचारिक भटकेपण संपुष्टात येऊ शकणार नाही असे परखड मत आपल्या अध्यक्षीय चिंतनातून मांडले. याप्रसंगी राजूभाऊ रत्ने यांनीही आपले विचार व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विजय जाधव, सूत्रसंचालन नामा बंजारा , आभार प्रदर्शन अनिल रत्ने यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ. यशवंत घुमे, डॉ. सर्जनादित्य मनोहर, रणजित शेरे, प्रा. मोहन चव्हाण, डॉ. पंडित चव्हाण, शिवा गोर, शुग्रीव राठोड आदि मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

# तुकाराम महाराजांच्या कीर्तनामध्ये समतेचा स्वर–अशोक सरस्वती

**गडचिरोली । प्रतिनिधी**

जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या कीर्तनामध्ये सदैव समतेच्या विचारांचा स्वर धगधगत राहिल्याने आजही त्यांचे अभंग सामाजिक परिवर्तनासाठी दीपस्तंभाची भूमिका बजावत आहेत असा संदेश अशोक सरस्वती यांनी आपल्या कीर्तनामधून प्रतीत केला. गोंडवाना विद्यापीठातील जगद्गुरु संत तुकाराम महाराज अध्यासन आणि मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संत तुकाराम महाराज प्रबोधन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अशोक सरस्वती यांचे वारकरी संत परंपरेतील प्रवचन शैली या विषयावर कीर्तन झाले.

याप्रसंगी साहित्य अकादमीचे सदस्य डॉ. प्रमोद मुनघाटे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे मराठी विभाग प्रमुख व संत तुकाराम अध्यासन प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, संशोधक व लेखक डॉ. अशोक राणा, मराठी विभागाचे समन्वयक डॉ. श्याम खंडारे, जगद्गुरु संत तुकाराम महाराज अध्यासनाचे समन्वयक डॉ. हेमराज निखाडे यांच्यासह विद्यापीठातील विविध विभागातील प्राध्यापक उपस्थित होते.




**अशोक सरस्वती यांचा गौरव करताना डॉ शाम खंडारे**

अशोक सरस्वती आपल्या कीर्तनातून म्हणाले, संत तुकाराम महाराज यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थित अनेक संकटांचा सामना करीत आपल्या अभंगांची निर्मीती केली. त्यांच्या अभंगांमधून जीवनाकडे पाहण्यास सकारात्मक दृष्टीकोन प्राप्त होतो. त्यांचे अभंग सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी आजही अनमोल ठरतात. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी असे अनेक महापुरुष संत तुकाराम महाराजांच्या अभंगांनी प्रभावीत झालेले आहेत. संत तुकाराम महाराज यांनी चारशे वर्षापूर्वी निर्माण केलेल्या अभंगातून त्यांच्या विद्वत्तेची प्रचिती येते. समाजासाठी आपले सर्वस्व बहाल केलेल्या संत तुकाराम महाराजांच्या अभंगांमध्ये आजही सामाजिक समतेचा झरा पाझरताना दिसतो. त्यामुळे विद्यार्थी व तरुण पिढीने तुकाराम महाराजांच्या अभंगांचा अभ्यास करणे काळाची गरज आहे. सूत्रसंचालन प्रा. अमोल चव्हाण यांनी केले. स्वागत डॉ. श्याम खंडारे यांनी केले. परिचय प्रा. रोहित बापू कांबळे यांनी करुन दिला तर आभार प्रा. अनंता गावंडे यांनी मानले.

यावेळी शिक्षकेत्तर कर्मचारी, शिबीरार्थी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेगाव येथे परिवर्तन आघाडीचा संयुक्त मेळावा

**चिमूर । प्रतिनिधी**

आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील शेतकरी संघटना, स्वतंत्र भारत पक्ष, आणि विदर्भ राज्य आंदोलन समिती यांनी परिवर्तन आघाडीची स्थापना करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी किमान समान कार्यक्रम या धोरणावर एकत्र येऊन राज्यातील महायुती आणि महाविकास आघाडीविरुद्ध पर्याय निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे.

या परिवर्तन आघाडीचा संयुक्त मेळावा शनिवार, २४ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी १२ वाजता कुणबी समाज भवन, धानुका कंपाऊड, शेगाव (गजानन महाराज), जिल्हा अकोला येथे आयोजित करण्यात आला आहे.

मेळाव्याचे मार्गदर्शक म्हणून शेतकरी संघटनेचे अध्यक्ष ललित बहाळे, स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट, शेतकरी संघटनेचे नेते आणि माजी आमदार ड. वामनराव चटप, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष आणि माजी खासदार राजू शेट्टी, भारत राष्ट्र समीतीचे राज्य प्रमुख आणि माजी आमदार शंकरअन्ना धोंगडे, शेतकरी संघटनेच्या माजी अध्यक्षा आणि माजी आमदार सरोज काशीकर, आणि जय विदर्भ पार्टीचे अध्यक्ष अरूण केदार हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत.या मेळाव्याला शेतकरी संघटना आणि राज्यातील छोट्या राज्यांचे समर्थक पक्षांचे नेते, कार्यकर्ते, आणि इतर सर्व हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, अशी विनंती स्वभापचे प्रदेशाध्यक्ष मधुसूदन हरणे आणि युवा आघाडीचे माजी अध्यक्ष सतीश दाणी यांनी केली आहे.

# सावंगी मेघे पोलीस स्टेशनमध्ये सदभावना दिवस साजरा

## स्वर्गीय पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम आयोजित





**वर्धा । प्रतिनिधी**

स्वर्गीय पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त सावंगी मेघे पोलीस स्टेशनमध्ये सदभावना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात पोलीस स्टेशनचे ठाणेदार संदीप कापडे यांच्या प्रमुख उपस्थितीत राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले.

शासनाच्या निर्देशानुसार आयोजित या कार्यक्रमात सर्व पोलीस स्टेशनचे कर्मचारी सहभागी झाले होते. प्रतिमेला पूजन केल्यानंतर उपस्थित सर्वांनी सदभावना दिवसाची शपथ घेतली. ठाणेदार संदीप कापडे यांनी स्वर्गीय राजीव गांधी यांच्या विचारांना उजाळा देत, त्यांचा आदर्श कसा अनुसरावा, याबद्दल मार्गदर्शन केले.कार्यक्रमानंतर परिसरातील लोकांनी ठाणेदार कापडे यांच्या कार्याचे कौतुक केले. सदभावना दिवसाच्या निमित्ताने पोलीस स्टेशनमध्ये एकतेचा आणि सदभावनेचा संदेश देत या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# राखी पौर्णिमेचा सण यंदा भगिनींसाठी आनंद घेऊन आला: मंत्री डॉ. धर्मराव बाबा आत्राम

## मंत्र्यांना राखी बांधून लाडक्या बहिणींनी साजरा केले रक्षाबंधन

**अहेरी । प्रतिनिधी**

भारतीय संस्कृतीमध्ये सण आणि समारंभांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. या माध्यमातून नाती, कुटुंबांविषयी आपुलकी, प्रेम आणि जिव्हाळा व्यक्त करण्याची संधी मिळते. श्रावण महिन्यात येणारे सण नात्यांना अधिक दृढ करतात आणि समाजात चैतन्य निर्माण करतात. महायुती सरकारनेही याच विचारसरणीने राज्यातील नागरिकांचे कुटुंब म्हणून स्वागत केले आहे. राखी पौर्णिमेच्या आधीच 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या अंतर्गत राज्यातील समस्त भगिनींना ओवाळणी देण्यात आली आहे, असे राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री डॉ. धर्मराव बाबा आत्राम यांनी सांगितले.



राज्याच्या शेवटच्या टोकावरील छत्तीसगड सीमेवर असलेल्या दामरंचा येथे आयोजित कार्यक्रमात शेकडो महिलांनी मंत्री डॉ. आत्राम यांना राखी बांधून त्यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली. यावेळी महिलांनी मंत्री आत्राम यांना ओवाळणी दिली. कार्यक्रमात माजी पंचायत समिती सदस्य हर्षवर्धन बाबा आत्राम, रामेश्वर बाबा आत्राम, आणि स्थानिक राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.डॉ. आत्राम यांनी पुढे सांगितले की, महायुती सरकारने पहिल्यांदाच अशी योजना राबवली असून विरोधकांकडून टीका होत असली तरीही, राज्यातील भगिनींना आनंद देणारी योजना लाडके मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यशस्वीरित्या अंमलात आणली आहे. माझ्या भगिनींच्या खात्यात प्रत्येकी दोन महिन्यांचे तीन हजार रुपये जमा झाले असून, त्यामुळेच राज्यातील माता-भगिनींचा आशीर्वाद आम्हाला मिळत आहे.महायुती सरकार राज्यातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचे कार्य करत आहे आणि ते यापुढेही सुरू राहील. रक्षाबंधनाच्या निमित्ताने मिळालेला आशीर्वाद माझ्यासाठी खूप मोठा आहे आणि आपण याचे सदैव स्मरण ठेवणार आहोत, असे मंत्री डॉ. आत्राम यांनी सांगितले.

# उरण प्राथमिक शिक्षक पतपेढीची ४८ वी सर्व साधारण सभा: शिक्षकांचा उत्साह आणि पुढाकार



**उरण । प्रतिनिधी**

१८ ऑगस्ट २०२४ रोजी उरण प्राथमिक शिक्षक पतपेढीची ४८ वी सर्वसाधारण सभा जेएनपीटी मल्टीपर्पज हॉलमध्ये आयोजित करण्यात आली. या सभेला साडेसहाशे शिक्षक उपस्थित होते, ज्यांनी पतपेढीच्या कामगिरीवर चर्चा केली आणि भविष्यकालीन योजना स्पष्ट केल्या.

सभेच्या अध्यक्षपदावर चेअरमन शर्मिला महेंद्र गावंड यांनी नेतृत्व केले. गेल्या १५ वर्षांनंतर उरणमध्ये झालेल्या या सभेचा शिक्षकांमध्ये उत्साहाचा अनुभव होता. हॉलमध्ये खूप आनंद आणि उत्साहाचे वातावरण होते.

सभेत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे माजी व्हाइस चेअरमन जयदास घरत, उरणचे कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष नरेश मोकाशी, पनवेल तालुका अध्यक्ष प्रभाकर घरत, प्रकल्पग्रस्तांचे अध्यक्ष गंगाधर पाटील, जुनी पेन्शन संघटनेचे अध्यक्ष मंदारजी रसाळ, जुनी पेन्शन संघटनेच्या महिला अध्यक्ष माजी चेअरमन राजेश्री मोकल, शिक्षक सेनेचे जिल्हा सचिव हितेंद्र मात्रे, शिक्षक भारतीचे अध्यक्ष डांगरकर सर, अपंग संघटनेचे अध्यक्ष भोडकर, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष प्रितम वर्तक, जिल्हा सचिव विकास पाटील आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

सभेत अंदाजपत्रक मंजुरी, पोटनियम दुरुस्ती, आणि लेखापरीक्षणासाठी ऑडिटरची निवड यासारख्या विषयांवर चर्चा झाली. शिक्षकांच्या निवृत्ती मानधनात वाढ करण्याची मागणी करण्यात आली, ज्यावर विचार करण्यात येईल, असे चेअरमन शर्मिला गावंड यांनी सांगितले.

सभेच्या यशस्वीतेसाठी स्थानिक संघटनांनी विशेष योगदान दिले, आणि माजी आमदार मनोहर भोईर यांच्या प्रयत्नांनी सभेचा हॉल मोफत उपलब्ध झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिव व्याख्याते धिरेंद्र ठाकूर यांनी केले. सभेचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला, आणि शिक्षकांनी एकत्र येऊन पतपेढीच्या कामगिरीला वाचा दिली.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# फणसवाडी सेक्टर ११ मैत्री कट्टा: समाजसेवेत उल्लेखनीय योगदान

**उरण । प्रतिनिधी**

२० ऑगस्ट २०२४ रोजी फणसवाडी सेक्टर ११ मैत्री कट्टा मित्र परिवाराने आपल्या समाजिक बांधिलकीचा उत्कृष्ट परिचय देत विविध समाजकार्याचे आयोजन केले. उरण तालुक्यातील पिरकोन गावातील फणसवाडी सेक्टर ११ मधील या कट्ट्यावर एकत्र जमणाऱ्या समाजसेवकांनी तीन महत्वाची कार्ये पार केली आहेत.

पहिलं कार्य म्हणजे उरण-खारपाडा राष्ट्रीय महामार्ग ८६ वर वशेणी-सारडे दरम्यान असलेल्या गतीरोधकाच्या सुरक्षिततेसाठी सोलर पॅनल सिग्नल रिफ्लेक्टर बसविणे. या उपक्रमाद्वारे भविष्यात अपघात टाळण्यासाठी हा गतीरोधक दिवसा आणि रात्रीचे चमकणारे सोलर पॅनल सिग्नलद्वारे लक्षात येईल असे करण्यात आले.

दुसरं कार्य म्हणजे नागोठणे येथील बंगालवाडीच्या आदिवासी वाडीत राहणाऱ्या एका गरीब मुलाच्या वैद्यकीय खर्चासाठी मदत करण्यात आली. नऊ वर्षांचा सचिन संदीप वरक याच्या हाताच्या फ्रॅक्चर ऑपरेशनसाठी आवश्यक असलेला खर्च अत्यंत गरीब असलेल्या कुटुंबाला परवडणारा नव्हता. या समस्येचा समजून घेत फणसवाडी सेक्टर ११ मैत्री कट्ट्याच्या सदस्यांनी १४,००० रुपये जमा करून त्या कुटुंबाला मदत केली.








तिसरं कार्य म्हणजे पिरकोन-सारडे मार्गावरील सुभाष गावंड यांच्या घराच्या समोरील खड्यांमध्ये खडी माती टाकून आणि श्रमदान करून रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना आणि प्रवाशांना होणाऱ्या त्रासापासून वाचवले.

या समाजसेवी उपक्रमांनी फणसवाडी सेक्टर ११ मैत्री कट्टा मित्र परिवाराच्या कामकाजाची प्रशंसा सर्व स्तरांवर केली जात आहे. त्यांच्या सामाजिक कार्याने विविध समस्यांवर प्रभावी उपाययोजना करून समाजातील आवश्यकतेनुसार उत्तम सेवा पुरवली आहे.

# शेतकर्यांना सरसकट अनुदानाची मागणी: किसान अधिकार अभियानाने तहसीलदार सेलू यांना निवेदन

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

२० ऑगस्ट २०२४: सन २०२३-२४ हंगामाच्या अनुदानाची मदत शासनाने जाहीर केली आहे, परंतु पिक नोंदणी केलेल्या शेतकर्यांना ही मदत फक्त दिली जात आहे. ज्या शेतकर्यांची पिक नोंदणी झाली आहे, त्यांना या मदतीपासून वंचित राहण्याची वेळ आली आहे. यामुळे किसान अधिकार अभियानाने आज तहसीलदार सेलू यांना निवेदन दिले आहे.



किसान अधिकार अभियानाच्या माध्यमातून मागणी करण्यात आली आहे की, सततधार अतीवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकर्यांना कोणत्याही शासकीय अनुदानापासून वंचित राहू नये आणि सरसकट अनुदान देण्यात यावे. तसेच, शेतकर्यांच्या जमीनीचा फेरफार ४ ते ५ महिने विलंबाने होत असल्याची तक्रारही करण्यात आली आहे. फेरफाराच्या नोंदी वेळेत न झाल्यास, शेतकर्यांना अनुदान मदतीचा लाभ न मिळाल्यास शेतकरी सत्याग्रह आंदोलन करतील असा ईशारा देण्यात आला आहे.यावेळी किसान अधिकार अभियानाचे अध्यक्ष सुदाम पवार, वडगांव शाखा अध्यक्ष प्रफुल भैस, गुरूदेव वैरागडे, विशाल खोबे, रविंद्र ऊडान, निखील वैरागडे आणि परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

# खैरे कुणबी समाजाच्या वतीने विविध ठिकाणी गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार

**वर्धा । प्रतिनिधी**

संत सखुमाऊ सामाजिक संस्था खैरे कुणबी समाज वर्धा यांच्या वतीने १५ ,१८ आणि १९ ऑगस्ट रोजी वर्धा, समुद्रपुर, आणि हिंगणघाट येथे आयोजित केलेल्या विशेष कार्यक्रमांमध्ये ५६ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमांत गुणवंत विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र, आणि पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात आले.



वर्धा येथे धूनिवाले मठाजवळ आयोजित कार्यक्रमात २३ विद्यार्थ्यांचा सत्कार राखीव पोलीस निरीक्षक कमलाकर घोटेकर, ठाणेदार मंगेश भोयर, कलावती वाकोडकर, आणि प्रतिभा माऊसकर यांच्या हस्ते करण्यात आला. समुद्रपुर येथे १८ ऑगस्ट रोजी हिम्मतजी चतुर, बाबाराव थुटे, पिंटू बादले, आणि साधनाताई ठवरी यांनी १४ विद्यार्थ्यांना गौरवले. हिंगणघाट येथील बिडकर कॉलेजमध्ये १९ विद्यार्थ्यांचा सत्कार डॉ. प्रभाकर थुटे, राजू चाफले, प्रवीण उपासे, आणि अन्य मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमांना पालकवर्ग, समाजबांधव, आणि संस्थेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते, आणि सर्वत्र आनंददायी वातावरणात कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# वीज कंत्राटी कामगारांचा ऊर्जामंत्र्यांच्या घरासमोर बेमुदत उपोषणाचा इशारा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

वीज कंत्राटी कामगारांनी विविध प्रलंबित मागण्यासाठी सुधीर मुनगंटीवार यांच्या घरासमोर निदर्शने केली आहेत. शासनाच्या दुर्लक्षामुळे, येत्या २४ ऑगस्टपासून ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घरासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा आंदोलकांनी दिला आहे.




महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती कंपनीत कार्यरत वीज कंत्राटी कामगारांना कंत्राटदार मुक्त वयाच्या ६० वर्षांपर्यंत शाश्वत रोजगार प्रदान करण्याची मागणी आहे. हरियाणा राज्यातील कंत्राटदार मुक्त रोजगार पद्धतीची उदाहरणे दिली असून, महाराष्ट्रात देखील अशा प्रकारची योजना सुरू करण्याची आवश्यकता आहे.मागण्यांवर निर्णय न झाल्यास, नागपूरच्या रेशीमबाग मैदानावर तिन्ही वीज कंपन्यांतील कामगार सकाळी १० वाजता एकत्र येऊन पायी मोर्चा काढून बेमुदत आमरण उपोषण सुरू करणार आहेत.

# संदिप मेश्राम यांचे निधन

**नागभीड । प्रतिनिधी**

गिरगाव येथील ३२ वर्षीय तरुण संदिप मनोहर मेश्राम यांचे २० ऑगस्ट २०२४ रोजी मंगळवारला पहाटे सहा वाजता अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण गिरगाव क्षेत्रात शोककळा पसरली आहे.



संदिप मेश्राम यांचे अंत्यसंस्कार गिरगाव येथील स्मशानभूमीत दुपारी एक वाजता करण्यात आले. त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी आणि दोन मुली असा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनाने कुटुंबीयांमध्ये व आजुबाजूच्या समाजात दु:खाचे वातावरण आहे. संदिप मेश्राम यांच्या स्मरणार्थ त्यांच्या कुटुंबीय, मित्र-परिवार आणि समाजातील सदस्यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

# शहीद डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त निर्भय मार्निंग वॉक व सर्प विज्ञान प्रबोधन कार्यक्रम




**ऊर्जानगर (चंद्रपूर) । प्रतिनिधी**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक अध्यक्ष शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचा दि. २० ऑगस्ट २०१३ रोजी सकाळी मॉर्निंग वॉकवरून परत येताना निर्घृण हत्या करण्यात आली होती. त्या घटनेला आज ११ वर्षे पूर्ण झाली आहेत.

या निमित्ताने शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचा स्मृतिदिन राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिन म्हणून साजरा करण्यात आला. सकाळी मार्निंग वॉक घेण्यात आली, नंतर शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी खालील घोषणाही देण्यात आल्या:

शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर, अमर रहें, अमर रहें.

फुले शाहू आंबेडकर, आम्ही सारे दाभोळकर.

उठ माणसा जागा हो, अंनिसचा एक धागा हो.

हल्लेकरांनो हाय हाय, विवेकाचा आवाज संपणार नाय.

आवाज दो, हम एक है, विवेकाचा आवाज बुलंद करूया.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा ऊर्जानगरच्या वतीने वसाहतीतील पर्यावरण चौक येथून सौदामिनी चौक मार्गे पोस्ट ऑफिस, आंभोरा चौक आणि पर्यावरण चौक पर्यंत मार्निंग वॉक घेण्यात आली. या वॉकचे आयोजन चंद्रपूर जिल्हा कार्याध्यक्ष पी. एम. जाधव आणि अध्यक्ष सूर्यकांत खणके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी महा अंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष पी. एम. जाधव, जिल्हा प्रधान सचिव नारायण चव्हाण, ऊर्जानगरचे कार्याध्यक्ष देवराव कोंडेकर, अध्यक्ष मुरलीधर राठोड, प्रधान सचिव बाळकृष्ण सोमलकर, किशोर मुगल, दुरेंद्र गेडाम, संजय जुनारे, सुरेंद्र इंगळे, भैयाजी उईके, सुभाष भानारकर, वंदना मनपे आणि महिला सहकार्यवाहक यांची उपस्थिती होती.

दुपारी ऊर्जानगर वसाहतीजवळच्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा खैरगांव (चांदसूरला) येथे सर्प विज्ञान प्रबोधन व प्रदर्शनी कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात सापाविषयी असलेले समज व गैरसमज चित्रफितीद्वारे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले आणि सापांच्या प्रकाराबद्दल (विषारी व बिनविषारी) माहिती देण्यात आली. यावेळी अंनिस पदाधिकारी, शिक्षक सुरेंद्र शेंडे, शिक्षिका गीता आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

## रस्त्याच्या दुरावस्थेचा तीव्र निषेध

# आमदार समीर कुणावार यांना 'खड्डेसम्राट' संबोधून शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आंदोलन

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

सेलडोह-सिंदी-कांढळी या राष्ट्रीय महामार्गावर कंत्राटदाराने अर्धवट रस्त्याचे बांधकाम केल्याने रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत, ज्यामुळे वाहने चालवणे अत्यंत कठीण झाले आहे. या गंभीर समस्येच्या विरोधात शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मंगळवारी २० ऑगस्ट रोजी आमदार समीर कुणावार यांचा निषेध नोंदविला आणि खड्ड्यात बेशरमाचे झाड लावले.



संदी-सेलडोह-कांढळी हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३५३ (आय) आहे. या रस्त्याचे बांधकाम मागील १० वर्षांपासून सुरू असून केदारेश्वर इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी, मुंबईला या कामाची जबाबदारी देण्यात आले आहे. मात्र, राष्ट्रीय महामार्ग विभाग आणि कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे रस्त्यावर १२ ठिकाणी अर्धवट बांधकाम झाले आहे. यामुळे रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. खड्ड्यात पाणी साचल्याने या मार्गावरून पायी चालणे आणि वाहन चालवणे कठीण झाले आहे. काही वाहनधारक खड्ड्यात पडल्याच्या घटनाही वारंवार घडत आहेत. संपूर्ण क्षेत्रात वाहतूक वर्दळ मोठ्या प्रमाणात असते, विशेषतः समृद्धी महामार्गामुळे येथे लहान-मोठ्या वाहनांसह जड वाहनांची वर्दळ असते. त्यामुळे रस्त्याची दुरवस्था झाली आहे. २ आणि ३ सप्टेंबर रोजी सिंदी शहरात तान्हापोळा उत्सव असल्याने, याठिकाणी मोठ्या संख्येने नागरिक येतात. रस्त्याची दुरवस्था असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष आहे. शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने या परिस्थितीवर तीव्र आंदोलन केले असून, चार दिवसांच्या आत रस्त्याची दुरुस्ती न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

आमदार समीर कुणावार यांना 'खड्डेसम्राट' संबोधून विरोध दर्शविणारे नारे देण्यात आले. यावेळी तुषार हिंगणेकर (युवा सिंदी शहर अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस), धनराज झिलपे, फिरोज बेरा, प्रभाकर कलोडे, रवी राणा, जगदीश बोरकर, युगल अवचट, बंटी बेलखोडे, सुनील शेंडे, राजु कोपरकर, राजु दांडेकर, विशाल चिंचुलकर, राजु कातोरे, सुभाष डांगरे आणि राजू दांडेकर यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोहोळ येथील घाटुळे नर्सरी: शेतकऱ्यांसाठी एक आदर्श शैक्षणिक आणि व्यावसायिक केंद्र

**मोहोळ । प्रतिनिधी**

येथील घाटुळे नर्सरीने गेल्या दोन दशकांत शेती क्षेत्रात केलेले नवे प्रयोग आणि आदर्श कार्य यामुळे शेतकऱ्यांमध्ये खूपच आदर प्राप्त केला आहे. सुनील घाटुळे आणि स्वानंद घाटुळे यांच्या नेतृत्वाखाली घाटुळे नर्सरीने नर्सरी उद्योगात एक अनोखी ओळख निर्माण केली आहे.घाटुळे नर्सरीच्या प्रात्यक्षिक डेमो प्लॉट्समुळे शेतकऱ्यांना आधुनिक आणि प्रभावी शेती पद्धतींचा अभ्यास करण्यास एक अद्वितीय संधी मिळाली आहे.

या नर्सरीने कमी खर्चात उच्च गुणवत्तेच्या भाजीपाला उत्पादनाची प्रदर्शनी तयार करून शेतकऱ्यांना एक आदर्श नमुना उपलब्ध करून दिला आहे. ब्रोकोली, पेरू, झेंडू, कलिंगड, मिरची आणि कारले यासारख्या विविध पिकांच्या प्रात्यक्षिकाने शेतकऱ्यांना उन्नत शेती पद्धतींचे महत्त्व आणि उपयोग समजून घेण्यात मदत केली आहे.





आधुनिक ठिबक सिंचन आणि ऑटोमॅटेड व्यवस्थापनाचा वापर करून तयार केलेल्या ३० एकर क्षेत्रातील प्लॉट्सने शेतीत गुणवत्ता आणि उत्पादन वाढवण्यासाठी एक आदर्श सेट केला आहे. यामुळे शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञानाचा लाभ घेण्याची आणि त्याच्या फायद्यांचा अनुभव घेण्याची संधी मिळाली आहे.घाटुळे नर्सरीने शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी केलेल्या विविध कार्यांचा आदर केला जातो, विशेषतः त्यांच्या योगदानामुळे अनेक शेतकऱ्यांना शेतीत उत्कृष्टतेचा अनुभव घेता आला आहे. त्यांनी नर्सरी आणि शेतकरी यांच्यातील एक मजबूत दुवा निर्माण केला असून, शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतींचे मार्गदर्शन करून त्यांची आर्थिक स्थिती सुधारली आहे. घाटुळे नर्सरीच्या कार्यामुळे अनगरच्या शेतकऱ्यांनी गुणवत्तेच्या पिकांचे उत्पादन करून आपली शेती अधिक फायदेशीर केली आहे. त्यांच्या सामाजिक योगदानामुळे त्यांचा आदर्श ठरला आहे आणि त्यांच्या कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक केले जात आहे.

# स्त्रीसन्मानाचा संकल्प:भाजप महिला मोर्चाचे लक्ष!

## रक्षाबंधनाच्या कार्यक्रमात ना.सुधीर मुनगंटीवार यांनी दिला स्त्रीसन्मानाचा विश्वास

**पोंभूर्णा । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीच्या महिला मोर्चाने स्त्रीसन्मान आणि महिलांसाठी विविध योजनांचे प्रभावी कार्य करणे हे आपले प्रमुख लक्ष्य ठरवले आहे, असे प्रतिपादन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केले. पोंभूर्णा येथील सुमन मंगल कार्यालयात आयोजित रक्षाबंधनाच्या कार्यक्रमात त्यांनी महिला मोर्चाच्या सदस्यांना एकमेकांना मदत करण्याचा संकल्प करावा आणि सरकारच्या योजनांचा लाभ सर्वसामान्य महिलांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन केले.







कार्यक्रमाला भाजपचे जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, प्रदेश महिला मोर्चा महामंत्री अल्का आत्राम, पोंभूर्णा नगराध्यक्ष सुलभा पिपरे, नगर परिषद उपाध्यक्ष अजित मंगळगिरीवार, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष वंदना शेंडे, चंद्रपूर महानगर महिला मोर्चाच्या अध्यक्ष सविता कांबळे, चंदू मारगोनवार, विनोद देशमुख, गुरुदास पिपरे, हरीश ढवस, शहर महिला मोर्चा अध्यक्ष वैशाली बोलमवार आणि गजानन मोडकुलवार यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

ना. मुनगंटीवार यांनी सरकारच्या विविध योजनांचा उल्लेख केला, जसे की जीवनदायी योजना, आयुष्यमान भारत, आणि मातृवंदन. त्यांनी सांगितले की, देशगौरव पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी ८० कोटी लोकांना मोफत धान्य दिले आहे आणि ग्रामीण भागातील मुलींना सायकल देण्याची योजना सुरू केली आहे.ते म्हणाले, स्त्रीचा सन्मान महाराष्ट्राचा सन्मान आहे. प्रत्येक बहिणीपर्यंत १५०० रुपये पोहोचविण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. महिलांच्या अडचणींवर मात करण्यासाठी सरकारने विविध योजनांची घोषणा केली असून, महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी जिल्ह्यात कॉल सेंटर निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.कार्यक्रमाच्या शेवटी, पोंभूर्णा येथील बहिणींनी ना. मुनगंटीवार यांना राखी बांधली आणि हक्क, संरक्षण व उत्कर्षासाठी त्यांचा सतत पाठिंबा राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

## शिवम चिखलेची आर्चरी संघातील चाचणीसाठी निवड

**करमाळा । प्रतिनिधी**

येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील विद्यार्थी शिवम राजेंद्र चिखले याची भारतीय आर्चरी संघाच्या चाचणीसाठी निवड झाली आहे. या आंतरराष्ट्रीय स्पर्धा बांगलादेश आणि चीनमध्ये होणार आहेत. भारतीय संघाच्या निवडीसाठीच्या चाचणीसाठी पुढील आठवड्यात सोनीपत, हरियाणा येथे तयारी केली जाणार आहे. महाराष्ट्र संघातून शिवम राजेंद्र चिखले याची निवड झाली असून, यापुढे भारतीय आर्चरी संघातील अंतिम खेळाडूंची निवड होईल.



यशस्वी विद्यार्थ्याला महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक व तालुका क्रीडा समन्वयक प्रा. राम काळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. शिवमच्या यशाचे अभिनंदन करताना, संस्थेचे सचिव विलासरावजी घुमरे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, सहसचिव विक्रमसिंह सूर्यवंशी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. बी. पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक, तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## कोळगाव ते हिवरे गौंडरे रस्त्याच्या कामास त्वरित प्रारंभाची मागणी; अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

**करमाळा । प्रतिनिधी**

कोळगाव ते हिवरे गौंडरे या मुख्य रस्त्याची अत्यंत खराब स्थिती लक्षात घेऊन बळीराजा शेतकरी संघटनेने प्रशासनाला ठणकावून इशारा दिला आहे. रस्त्यावर खड्ड्यांची भरमार असून, प्रवाशांसह शालेय विद्यार्थ्यांना अत्यंत धोकादायक प्रवासाचा सामना करावा लागत आहे. या रस्त्यावरून जाणारा प्रत्येक प्रवासी जणू जीव मुठीत धरून प्रवास करतो. श्री क्षेत्र हिवरे येथे प्रसिद्ध हेंबाडपंतीश्री नागोबा देवस्थान असल्यामुळे श्रावणी सोमवारी मोठी यात्रा भरते, तसेच हिवरे गावातील कुस्त्यांच्या आखाड्यांमुळेही येथे भक्तांची मोठी गर्दी असते. मात्र, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे रस्त्याची स्थिती अधिकच बिकट झाली आहे.



बळीराजा शेतकरी संघटनेचे सोलापूर जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब सुपनवर यांनी आठ दिवसांच्या आत या रस्त्याचे काम सुरू न केल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. त्यांनी लोकप्रतिनिधींवर जनतेची फसवणूक केल्याचा आरोप केला असून, संबंधित कार्यकर्ते, शेतकरी, आणि ग्रामस्थांनी एकत्र येऊन आंदोलनाच्या तयारीला सुरुवात केली आहे.

या संदर्भात माजी पंचायत समिती सदस्य तात्यासाहेब शिंदे, करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य पैलवान बाळासाहेब पवार, पत्रकार दत्ता ठोंबरे, नागेश चेडगे, दत्ता डवले, कोळगावचे सरपंच अनिल शिंदे, हिवरेचे सरपंच दिलीप फरतडे, तसेच मारुती नीळ, आबा अंबारे, तात्या तांबे, हनपुडे यांसह अन्य ग्रामस्थांनी उपस्थित राहून प्रशासनाला तातडीने काम सुरू करण्याचे आवाहन केले आहे. जर आठ दिवसांत कामाची सुरुवात झाली नाही, तर संघटनेने आंदोलनाच्या तयारीला उधाण येणार असून, यासाठी प्रशासनाला पूर्णपणे जबाबदार धरले जाईल.

## वाघाच्या हल्ल्यात गुराखी ठार; सावली तालुक्यात भीतीचे वातावरण

**सावली**–तालुक्यातील शिर्षी गावात जंगलात गुरे चारायला गेलेला दिवाकर नथुजी आवळे (वय ४५ वर्षे) याला पट्टेदार वाघाने हल्ला करून ठार केले. ही घटना २० ऑगस्टला दुपारी १.३० च्या सुमारास घडली.

शिर्षी गाव जंगलाच्या जवळ असल्याने येथे वाघ आणि बिबट्यांचा धुमाकूळ सुरू आहे. या प्राण्यांमुळे मानव-वन्यजीव संघर्ष मोठ्या प्रमाणात होत असल्याचे दिसून येत आहे. दिवाकर आवळे हे गुरे चारण्यासाठी जंगलाशेजारील शेतशिवारात गेले असता, अचानक आलेल्या वाघाने त्यांच्यावर हल्ला केला, ज्यामध्ये ते जागीच ठार झाले.या घटनेचा प्रत्यक्षदर्शी दुसरा गुराखी गावात धावत जाऊन घटनेची माहिती देत असताना बेशुद्ध झाला. गावकऱ्यांनी तत्काळ सावली वनविभागाला या घटनेची माहिती दिली. वनपरीक्षेत्र अधिकारी विनोद धुर्वे यांनी घटनास्थळी पोहचून शोधकार्य सुरू केले असता दिवाकर आवळे यांचा मृतदेह आढळून आला.या घटनेनंतर शिर्षी परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. परिसरातील जनतेने सावली वनविभागाकडे या हिंसक वाघाचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे .

## जेऊर-कुगाव रस्त्यासाठी यशस्वी मध्यस्थी करणाऱ्या तहसीलदार शिल्पा ठोकडे यांचा सन्मान



> जेऊरपासून दोन पर्यंत हा रस्ता आदिवासी क्षेत्रासमान झाला होता. कोणत्याही प्रतिनिधीने यावर मार्ग काढू शकला नाही. अनेक वर्षांपासून हा रस्ता रखडला होता, जत्रेपूरती डागडुजी होत होती. मंजूर होऊनही कामाचा शुभारंभ होत नव्हता. शेवटी, ग्रामस्थांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकला. त्यानंतर तहसीलदार ठोकडे यांच्या अथक प्रयत्नामुळे हा रस्ता सुरू झाला आहे. अशा बिकट परिस्थितीला जबाबदार कोण? असा प्रश्न आहे.
>
> **अविनाश सरडे,**
> **प्रगतशील बागायतदार, चिखलठाण**


**करमाळा । प्रतिनिधी**

जेऊर- कुगाव रस्त्याच्या कामासाठी यशस्वीपणे मध्यस्थी करणाऱ्या तहसीलदार शिल्पा ठोकडे यांचा सन्मान चिकलठाण परिसरातील पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी केला. यावेळी विद्या अविनाश सरडे, कोमल योगेश सरडे, योगेश दत्तात्रय सरडे आणि अविनाश मारुती सरडे यांच्या हस्ते तहसीलदार शिल्पा ठोकडे यांचा सन्मान करण्यात आला.

गेल्या अनेक वर्षांपासून जेऊर ते चिखलठाण आणि चिखलठाण ते कूगाव या दोन रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था होती. या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले होते. या भागातील प्रसिद्ध कोटलिंग देवस्थान असतानाही प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले. सार्वजनिक बांधकाम विभागाने कूगाव ते चिखलठाण रस्त्याचे काम अर्धवट केले होते, त्यामुळे ग्रामस्थ संतप्त झाले होते. रस्त्याचे पूर्ण रुंदीकरण व डांबरीकरण करण्यासाठी ग्रामस्थांनी वारंवार प्रयत्न केले, तरीही प्रशासनाने लक्ष दिले नाही.

अखेर, तहसीलदार शिल्पा ठोकडे यांनी यशस्वीपणे मध्यस्थी करून बहिष्कार मागे घेण्यास प्रवृत्त केले. त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी सुनीता पाटील*आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता कुंडलिक उबाळे यांच्यासह बैठकीचे आयोजन केले. त्यानंतर, या रस्त्याचे काम सुरू झाले असून, सध्या शेटफळ पर्यंत रस्त्याचा पहिला लेयर पूर्ण झाला आहे.जेऊर ते कुगाव रस्त्यासाठी १२ जुलै ते १४ जुलैपर्यंत सलग तीन दिवस *अविनाश सरडे, **योगेश सरडे, **सचिन गावडे, आणि **शंकर बोंद्रे* यांनी उपोषण केले होते. यावेळी तहसीलदार शिल्पा ठोकडे यांनी उपोषण स्थळी भेट देऊन बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यांनी अधिकार्याकडून विना थांबा काम पूर्ण करू असे लेखी पत्र घेतले व तत्काळ काम सुरू केले. या प्रकारामुळे अशा कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांचा सन्मान करणे हे आमचे कर्तव्य आहे, असे *योगेश सरडे* यांनी सांगितले.

## पोटेगावच्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनाने,शेवटचा दिवस झाला गोड



**करमाळा । प्रतिनिधी**

पोटेगाव येथे गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता हभप विठ्ठल महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. हजारोंच्या जनसमुदायाच्या साक्षीने हा भव्यदिव्य सोहळा पार पडला. यामध्ये पोटेगाव, बोरगाव, निलज, बाळवाडी, तरटगाव, आलजापूर, पाडळी, घारगाव आदी गावांतील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या सोहळ्यात दत्तकला शिक्षण संस्थेच्या सचिवा माया झोळ यांची उपस्थिती विशेष लक्षणीय ठरली.हभप विठ्ठल महाराज यांनी आपल्या ओघवत्या शैलीत बहारदार कीर्तन सादर करून सर्वांची मने जिंकली. त्यांनी तरुणांना व्यसनापासून दूर राहण्याचे, नियमित व्यायाम करण्याचे, आई-वडिलांची सेवा करण्याचे, मुलांच्या शिक्षणावर लक्ष देण्याचे आणि महिलांना मानसन्मान देण्याचे आवाहन केले.कार्यक्रमात माया झोळ यांच्या उपस्थितीबद्दल त्यांचा ग्रामपंचायत सरपंच आशा अजिनाथ भागडे, सदस्य झुंबर अण्णा कावळे, माजी सरपंच नाईकनवरे, पोलीस पाटील अंकुश शिरगिरे, आणि हभप विठ्ठल महाराज यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सत्कार समारंभात उत्तर देताना झोळ यांनी पोटेगावमधील कमीतकमी पाच आणि जास्तीत जास्त दहा मुलींच्या शिक्षणाची सोय करून त्यांना दत्तक घेण्याचे आश्वासन दिले.या सोहळ्याच्या शेवटच्या दिवशी गावकऱ्यांनी उत्कृष्ट स्नेहभोजनाचे नियोजन करून हा दिवस गोड केला.

# जुन्या बस स्टँड चौकाला क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव

## पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या सुचनेनुसार ढोलेंचे उपोषण मागे

**पोंभुर्णा । प्रतिनिधी**

शहरातील जुना बसस्टँड चौकाचे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले असे नामकरण करण्याच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते भुजंग ढोले यांनी गेल्या चार दिवसांपासून आमरण उपोषण सुरू केले होते. २० ऑगस्टला त्यांच्या उपोषणाची समाप्ती झाली असून पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या सुचनेनुसार नगरपंचायतीतील भाजपा पदाधिकाऱ्यांनी सर्वसंमतीने ठराव करून स्थानिक जुना बसस्टँड चौकाचे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले असे नामकरण करण्यात येईल असे पत्रक उपोषणकर्त्या भुजंग ढोले यांना दिले.याप्रसंगी माजी जि. प. अध्यक्ष देवराव भोंगळे यांनी उपस्थित राहून जुना बसस्टँड चौक यापुढे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले चौक म्हणून ओळखला जाईल, असे सांगत आनंद व्यक्त केला. दि. १६ ऑगस्टपासून भुजंग ढोले यांचे आमरण उपोषण सुरू होते. त्यांच्या मागणीची दखल घेऊन राज्याचे वनमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी उपोषणकर्त्याच्या मागण्या मान्य करून नगरपंचायतीच्या माध्यमातून तसा ठराव करण्याच्या सूचनांची घोषणा केली.२० ऑगस्टला सकाळी नगराध्यक्ष सुलभा पिपरे, उपनगराध्यक्ष अजीत मंगळगिरीवार, नगरसेविका नंदा कोटरंगे, आकाशी गेडाम, श्वेता वनकर, रोहिणी ढोले, शारदा गुरनूले, नगरसेवक संजय कोडापे, दर्शन गोरंटीवार, महेश रणदिवे, उषा गोरंतवार यांनी सर्वसंमतीने ठराव करून उपोषणकर्त्या भुजंग ढोले यांना ठरावाची प्रत सुपूर्त केली.

उपोषणस्थळी नगराध्यक्ष सुलभा पिपरे, उपनगराध्यक्ष अजीत मंगळगिरीवार आणि शहराध्यक्ष ऋषी कोटरंगे यांच्या हस्ते लिंबूपाणी पिऊन भुजंग ढोले यांनी उपोषण संपवले.देवराव भोंगळे यांनी सांगितले की, क्रांतीसूर्य ज्योतीबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी महाराष्ट्रात शिक्षणाची दारे उघडली. पुणे हे शिक्षणाचे माहेरघर असले तरी पुणे विद्यापीठाचे सावित्रीबाई फुले विद्यापीठ असे नामकरण करण्यासाठी ना. सुधीर मुनगंटीवार यांनी यशस्वी प्रयत्न केले. पोंभुर्णा शहरातील विविध समाजांच्या नागरिकांनी विकासासंदर्भात केलेल्या प्रत्येक मागणीला पूर्ण करण्याचे काम त्यांनी केले आहे. पोंभुर्ण्यात माळी समाजासाठी भव्य सामाजिक सभागृहाची निर्मिती सुद्धा त्यांनी केली.या कार्यक्रमास भाजपा नेते राजेंद्र महाडोळे, नगराध्यक्षा सुलभा पिपरे, भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश महामंत्री अल्का आत्राम, जिल्हा महामंत्री संध्या गुरूनूले, ओमदेव पाल, बाजार समितीचे सभापती रवी मरपल्लीवार, संचालक रवींद्र गेडाम, शहर महामंत्री गुरूदास पिपरे, चरण गुरनूले, गजानन मडपूवार, तालुकाध्यक्ष अजय मस्के, नैलेश चिंचोलकर, वर्षा लोनबले, धनराज सातपुते, राकेश गव्हारे, सुनील कटकमवार, राजु ठाकरे, मारोती मोहुर्ले, जितेंद्र चुदरी, राहुल पाल, अमोल मोरे, शेखर व्याहाडकर यांचेसह अनेकांची उपस्थिती होती.

